पोलीस अधीक्षक, कार्यालय गडचिरोली
जनसंपर्क शाखा
P.R.O Office, Gadchiroli
**Phone No.** 07132223142 **Address:** SP Office,Gadchiroli
**E-mail** : prospoffice.gadchiroli@gmail.com

# वार्तापत्र

**दिनांक- २९/११/२०१९**

## नागरिकांनी नक्षल बॅनरची होळी करत दर्शविला नक्षल सप्ताहाला प्रखर विरोध

- **मा. पोलीस अधीक्षकांकडुन ग्रामस्थांचे कौतुक**

नक्षलवादी हे ०२ ते ०८ डिसेंबर दरम्यान पिएलजीए नक्षल सप्ताह पाळणार आहेत. या पार्श्वभूमीवर नक्षलवाद्यांकडून गडचिरोली जिल्ह्यातील उपविभाग भामरागड अंतर्गत येणाऱ्या पोलीस मदत केंद्र धोडराज हद्दीतील मौजा मेडपल्ली व मौजा हिंदेवाडा या ठिकाणी सप्ताह पाळण्याबाबत नागरिकांना आवाहन करणारे बॅनर लावुन दहशत पसरविण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यांचा हा प्रयत्न धोडराज पंचक्रोशीतील नागरिकांनी हाणुन पाडत नक्षलवाद्यांनी लावलेले बॅनर काढुन त्याची होळी केली आहे. यावेळी उपस्थित नागरिकांनी 'नक्षलवादी मुर्दाबाद, पोलीस प्रशासन जिंदाबाद' च्या घोषणा दिल्या.

गडचिरोली पोलीस दल आमच्यासाठी नेहमीच जनजागरण मेळावे, ग्रामभेटी, शांती मेळावे इ. कार्यक्रम राबवुन आम्हा आदिवासी बांधवांसाठी सुविधा उपलब्ध करून देण्याचे प्रयत्न करत असतात. याउलट नक्षलवादी निष्पाप नागरिकांचा खुन करून समाजामध्ये दहशत पसरविण्याचा प्रयत्न करत असतात. त्याच बरोबर आमच्या पर्यंत सोई- सुविधा पोहचु नये यासाठी सप्ताहाच्या नावाखाली रस्त्यावर झाडे पाडुन आमचे जनजीवन विस्कळीत करण्याचा प्रयत्न करत असतात. या नक्षलवाद्यांचा जाहीर निषेध करण्यासाठी आम्ही गावकऱ्यांनी एकत्र येवुन नक्षल सप्ताहाला प्रखर  विरोध दर्शवत नक्षलवाद्यांनी लावलेल्या बॅनरची होळी करत असल्याचे ग्रामस्थांनी स्पष्ट केले.

लोकशाही व संविधान न मानणारे नक्षलवादी सप्ताहाच्या नावाखाली स्थानिक आदिवासी बांधवांमध्ये दहशत पसरविण्याचा प्रयत्न करत असतात. परंतु धोडराज येथील ग्रामस्थांनी पुढाकार घेवुन नक्षली सप्ताहाला विरोध करण्याबरोबरच नक्षली बॅनरची होळी केली. याबद्दल मा. पोलीस अधीक्षक श्री. शैलेश बलकवडे सो. यांनी धोडराज पंचक्रोशीतील ग्रामस्थांचे कौतुक केले आहे.



